सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : १५५ | बुधवार, दि. २५ फेब्रुवारी २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

आजचे अभीष्टचिंतन





श्री. मुन्नाभाऊ शर्मा
माजी नगरसेवक, अमळनेर



श्री. प्रितम भार्गव
अमळनेर



श्री. शरद पाटील
सामाजिक कार्यकर्ता



श्री. संजय सोनवणे
श्री मंगळग्रह मंदिर, सेवेकरी

राष्ट्रसंत गाडगेबाबा जयंतीनिमित्त मिरवणूक उत्साहात

...पान २ वर

**प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना**

# 'एमएसईडीसीएल'ने केलेल्या तांत्रिक बदलांमुळे अडथळे

## अमळनेर सोलर असोसिएशनचे प्रांताधिकाऱ्यांना निवेदन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : घरगुती वीज ग्राहकांनी स्वतःच वीज निर्मिती करून सक्षम करण्याचा व छतावरील सौर ऊर्जानिर्मितीचा वाटा वाढविण्यासाठी केंद्र सरकारने प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना सुरू केली आहे. मात्र, ही योजना प्रभावीपणे राबविण्यास अडथळे निर्माण झाले आहेत. 'एमएसईडीसीएल'कडून पोर्टलवर करण्यात आलेले तांत्रिक बदल सामान्य नागरिकांसाठी अडचणीचे ठरत आहेत. त्यामुळे या योजनेसाठी नागरिकांचा उत्साह कमी होताना दिसत आहे. या तांत्रिक बदलांबाबत येथील सोलर असोसिएशनने प्रांताधिकारी मयूर भंगाळे यांना नुकतेच निवेदन दिले आहे.

निवेदनात म्हटले आहे, की नवीन सौर प्रकल्पाची क्षमता गेल्या १२ महिन्यांच्या सरासरी वीज वापरावर मर्यादित ठेवण्याचा नियम हा सामान्य नागरिकांसाठी अन्यायकारक आहे. राज्यातील निवासी ग्राहकांसाठी वीज दर देशातील सर्वाधिक दरांपैकी एक आहेत. प्रति युनिट साधारणतः ९ रुपयांपासून १९. ५० पर्यंत आहेत. या उच्च दरांमुळे ग्राहक जाणीवपूर्वक वीज वापर मर्यादित ठेवतात. अशा 'दाबलेल्या' वापराच्या आधारावर सौर क्षमतेवर मर्यादा घालणे म्हणजे ग्राहकांना अधिक क्षमतेची सौर यंत्रणा बसविण्यापासून रोखणे होय.

अनेक नागरिक भविष्यात इलेक्ट्रिक वाहन, एसी, गिझर, इंडक्शन कुकिंग आदी उपकरणे वापरण्याच्या उद्देशाने सौर प्रकल्प बसवित आहेत. मात्र, एमएसईडीसीएल फक्त मागील वापराचा विचार करत असल्याने ग्राहकांना भविष्यातील गरजांसाठी योग्य क्षमता बसविणे शक्य होत नाही. हे धोरण ऊर्जा स्वावलंबनाच्या संकल्पनेलाच बाधा आणणारे आहे. एमएसईडीसीएलकडून जादा वीज निर्यात केल्यामुळे तोटा होत असल्याचा दावा केला जातो. मात्र, तांत्रिक व आर्थिक विश्लेषणानुसार हे दावे वस्तुस्थितीशी विसंगत आहेत. ग्राहकांकडून निर्यात होणाऱ्या अतिरिक्त विजेसाठी सुमारे २ रुपये ९० पैसे प्रति युनिट दराने मोबदला दिला जातो. जो ग्राहकांकडून आकारल्या जाणाऱ्या ९ ते १९रुपयांपेक्षा खूप कमी आहे. ग्राहकांना रोख स्वरूपात देय दिले जात नाही. केवळ बिलामध्ये समायोजन केले जाते. त्यामुळे वितरण कंपनीला कमी दरात उच्च मूल्याची वीज उपलब्ध होते. त्यासाठी कोणताही अतिरिक्त पायाभूत खर्च लागत नाही.

केंद्र शासनाने १० किलो वॅटपर्यंत स्वयंचलित लोडवाढ मंजूर करण्याचा निर्णय घेतला होता. ही प्रणाली केवळ २ ते ३ महिन्यात एमएसईडीसीएलकडून थांबविण्यात आली. त्यामुळे पुन्हा एकदा कागदोपत्री प्रक्रिया, निरीक्षक यंत्रणा आणि अनावश्यक विलंब सुरू झाले आहेत.

निवेदनावर सोलर असोसिएशनचे अध्यक्ष प्रवीण शिंपी, उपाध्यक्ष नीलेश वाघ, जनरल सेक्रेटरी मनोज पाटील, कोशाध्यक्ष नीलेश चव्हाण, खजिनदार किसन पाटील, सल्लागार महेश माकडिया, सदस्य सागर पाटील आदींच्या सह्या आहेत.

### या आहेत प्रमुख मागण्या

सौर प्रकल्प क्षमतेवरील १२ महिन्यांच्या सरासरी वापराची मार्यादा रद्द करावी. क्षमता मंजुरी मंजूर लोड उपलब्ध छत क्षेत्रफळाच्या आधारे द्यावे. १० किलो वॅटपर्यंत स्वयंचलित लोड वाढ प्रणाली सुरू करावी. राज्य वितरण धोरणे योजनेच्या तत्वांशी सुसंगत करावीत.



*अमळनेर : प्रांताधिकारी मयूर भंगाळे यांना निवेदन देताना सोलर असोसिएशनचे अध्यक्ष प्रवीण शिंपी, नीलेश वाघ, मनोज पाटील, नीलेश चव्हाण, किसन पाटील, महेश माकडिया, सागर पाटील आदी.*



*अमळनेर : गटविकास अधिकारी एन. आर. पाटील यांना निवेदन देताना अरुण पाटील, दीपक पाटील, रवींद्र सूर्यवंशी आदी.*

# लिपिक वर्गीय कर्मचाऱ्यांचे अमळनेरला कामबंद आंदोलन

## वेतनत्रुटी दूर करणे, पदोन्नती स्तर कमी करण्याची मागणी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : जय महाराष्ट्र शासकीय निमशासकीय अधिकारी व कर्मचारी संघटनेच्या येथील शाखेने अधिकारी, कर्मचाऱ्यांची वेतनातील तफावत दूर करावी व पदोन्नती स्तर कमी करण्याची मागणी केली आहे. याबाबत मंगळवार, दि. २४ फेब्रुवारीपासून पंचायत समिती कार्यालयासमोर संघटनेने बेमुदत कामबंद आंदोलन सुरू करण्यात आले आहे. तहसीलदार व गटविकास अधिकाऱ्यांना निवेदनही दिले आहे.

निवेदनात म्हटले आहे, की संघटनेने शासनास लिपिक संवर्गातील वेतनत्रृटी संदर्भातील प्रकरण दीर्घकाळापासून प्रलंबित असल्याने वारंवार निवेदने दिली आहेत. मुंबई व नागपूर येथे आंदोलनही केले आहे. मात्र, वेतनत्रृटीबाबत अद्यापही शासनाने समाधानकारक निर्णय घेतलेला नाही. त्यामुळे कर्मचाऱ्यांचे नुकसान होत आहे. या कामबंद आंदोलनात पंचायत समिती व जिल्हा परिषदेच्या कार्यालयातील लिपिकवर्गीय अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले आहेत. कामबंद आंदोलनात वरिष्ठ सहाय्यक अरुण पाटील, कनिष्ठ सहाय्यक रवींद्र सूर्यवंशी, उर्मिला पाटील, श्रीमती भारती कोळी, श्रीमती सुलोचना पाटील, श्रीमती रत्नमाला चौधरी, श्रीमती वैशाली पाटील, नितीन भदाणे, जवाहरलाल चव्हाण, दीपक पाटील, गणेश बागुल, अनिल पाटील, कैलास पाटील, शामकांत साळुंखे, हेमंत पाटील आदींचा समावेश आहे.

### या आहेत प्रमुख मागण्या

चौथ्या वेतन आयोगापासुन लिपीग वर्गीय संवर्गातील कर्मचारी यांची वेतनत्रुटी दुर करणे. लिपिक वर्गीय संवर्गाचे पदांची संख्या कमी न करता पदोन्नतीचे स्तर कमी करणे. लिपिक वर्गीय संवर्गाचे पदांचे नामकरण विकास अधिकारी व प्रशासन अधिकारी याप्रमाणे करणे. १/११/२००५ नंतर नियुक्त कर्मचारी यांना जुनी पेन्शन योजना जशीच्या तशी लागु करणे. अनु. जाती, जमाती, इमाव, व्हीजेएनटी, एनटी, यांचे पदोन्नतीमधील आरक्षण पुर्वीप्रमाणे लागु करणे. सरळसेवेमधील मागासवर्गीय आरक्षण पदे भरणे.

# पाडळसे प्रकल्पाला दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे नाव द्या

## आमदार अनिलदादा पाटील यांचे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांना विनंती पत्र

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**





अमळनेर : निम्न तापी प्रकल्प पाडळसे प्रकल्पाला दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे नाव देण्यात यावे, अशी मागणी आमदार अनिलदादा पाटील यांनी केली आहे. याबाबत आमदार अनिलदादा पाटील यांनी सोमवार, दि. २३ फेब्रुवारी रोजी राज्याचे मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्राताई पवार तसेच जलसंपदा मंत्र्यांना विनंती पत्र दिले आहे.

या विनंती पत्रात म्हटले आहे, की निम्न तापी प्रकल्प पाडळसे हा तापी नदीवरील अत्यंत महत्वाकांक्षी प्रकल्प आहे. या प्रकल्पाचे काम पूर्ण झाल्यानंतर अमळनेर, पारोळा, चोपडा, धरणगाव तसेच धुळे जिल्हयातील शिरपूर व शिंदखेडा या तालुक्यातील ४३ हजार ६०० हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येणार आहे. तसेच १७. १ टी.एम.सी. पाणी अडविण्याचे नियोजन आहे. या प्रकल्पाने शेती व पिण्याच्या पाण्याचा मोठा प्रश्न सुटणार आहे. तसेच औद्योगिक क्षेत्रासाठीही पाणी राखीव असल्याचे नियोजन आहे. हा महत्वाकांक्षी प्रकल्प पूर्ण होण्यासाठी दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या पाठपुराव्याने मंत्रीमंडळ बैठकीत डिसेंबर २०२४ मध्ये ४ हजार ८९० कोटी रुपये एवढी चतुर्थ सुधारित प्रशासकीय मान्यता राज्य शासनाने दिली आहे. त्यानंतर शासनाने प्रकल्प केंद्रीय जलआयोग (सीडब्ल्यूसी) यांच्याकडे प्रकल्प मान्यतेसाठी पाठविण्यात आला. त्यानंतर केंद्रीय जलआयोगाकडून इतर संबंधित विभागाच्या वैधानिक मान्यता प्राप्त झाल्या. त्यात महत्वाचे म्हणजे राज्याचा हिस्सा देण्याची हमी (स्व.) ना. अजितदादा पवार यांच्या मार्फत राज्य वित्त आयोग (एसएफसी) यांनी दिल्यानंतर सीडब्ल्यूसीने शिफारस करुन केंद्रीय जलशक्ती मंत्रालयाकडे प्रकल्प पाठविण्यात आला. केंद्रीय जलशक्ती मंत्रालयाने विशेष अधिकार समितीची मान्यता घेऊन प्रकल्पाचा प्रधानमंत्री कृषि सिंचाई योजनेत (पीएमकेएसवाय) समावेश करण्यात आला. या महत्वाकांक्षी प्रकल्पाचे जलपूजन (स्व.) ना. अजितदादा पवार यांच्या हस्ते करण्याचे नियोजन केले होते. मात्र, त्यांच्या पाठपुराव्याने हा प्रकल्प पूर्णत्वाकडे वाटचाल करीत असताना आज दुर्देवाने ते आपल्यात नसल्याने या प्रकल्पाला अजितदादा पवार निम्न तापी प्रकल्प पाडळसे, ता. अमळनेर, जि. जळगाव अशा नावास मान्यता द्यावी, असेही विनंती पत्रात म्हटले आहे.

### दिनविशेष

२५ फेब्रुवारी

- मुंबई-नागपूर-जमशेदपूर मार्गावर फॉक्स मॉथ विमानाने हवाई टपाल सेवा सुरू केली.
- पहिल्या भारतीय बनावटीच्या जमिनीवरून जमिनीवर मारा करणाऱ्या पृथ्वी क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी.

**गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

**स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!**

# प्रा. डॉ. लिलाधर पाटील लिखित इंग्रजी पुस्तकाचे प्रकाशन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील धनदाई महाविद्यालयातील इंग्रजी विभाग प्रमुख प्रा. डॉ. लिलाधर पाटील लिखित "ट्रॅडिशन्स इन इंडियन लिटरेचर्स" या इंग्रजी पुस्तकाचे नुकतेच कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या मानव्यविद्या शाखेचे अधिष्ठाता प्राचार्य डॉ. जगदीश पाटील यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. शिरपूर येथील आर. सी. पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या सभागृहात विद्यापीठ क्षेत्रातील इंग्रजी प्राध्यापकांच्या अभ्यासक्रम शाळेत सदर पुस्तकाचा प्रकाशन सोहळा झाला.

यावेळी विद्यापीठाच्या इंग्रजी अभ्यास मंडळाचे चेअरमन प्रा. डॉ. भूपेंद्र केसुर, विद्यापीठाचे सिनेट सदस्य डॉ. वर्षा पाटील, डॉ. गजानन पाटील व आर. सी. पटेल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. एस. महाजन आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. अथर्व प्रकाशन, जळगावतर्फे प्रकाशित या पुस्तकाचा विद्यापीठाच्या द्वितीय वर्ष इंग्रजी विषयाच्या अभ्यासक्रमात समावेश आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार भारतीय ज्ञानपरंपरेवर आधारित हे पुस्तक आहे. भारतीय ज्ञानपरंपरा ही एकल परंपरा नसून यात विविध भाषा, धर्म, तत्त्वज्ञान व सौंदर्यविषयक दृष्टींचा समावेश आहे. या परंपरेचा वेध घेत संस्कृत, प्राकृत, पाली तसेच विविध प्रांतीय भाषा व महाराष्ट्रातील वारकरी संतांच्या परंपरेचा वेध घेणारे हे पुस्तक इंग्रजी विषयाच्या विद्यार्थ्यांना आपल्या साहित्यिक परंपरेची जाणीव निर्माण करून देईल अशी अपेक्षा डॉ. लिलाधर पाटील यांनी व्यक्त केली. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार लागू झालेल्या अभ्यासक्रमात डॉ. लिलाधर पाटील यांचे हे दुसरे पुस्तक असून मागील वर्षी त्यांनी त्यांच्या सहकाऱ्यांसमवेत लिहिलेल्या 'इंग्लिश फॉर ऑल' या पुस्तकाचे केंब्रिज युनिव्हर्सिटी प्रेस तर्फे प्रकाशन करण्यात आले होते. ते पुस्तक प्रथम वर्ष इंग्रजी विषयासाठी अभ्यासाला असून हे नव्याने प्रकाशित झालेले पुस्तक द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना अभ्यासता येणार आहे. याबद्दल इंग्रजी विषयातील अभ्यासक्रम मंडळाच्या सर्व सदस्यांनी तसेच उत्तर महाराष्ट्र इंग्रजी प्राध्यापक संघटनेचे अध्यक्ष डॉ. अनिल पाटील, उपाध्यक्ष डॉ. पंडित चव्हाण, सेक्रेटरी डॉ. दिनानाथ पाटील, सिनेट सदस्य डॉ. धीरज वैष्णव, प्रा. नितीन पाटील यासह सर्व सदस्यांनी त्यांचे याप्रसंगी विशेष अभिनंदन केले. सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. कमलाकर पाटील व मुख्य समन्वयक डॉ. आर. व्ही. सोनार यांनी विशेष परिश्रम घेतले.



*शिरपूर : आर. सी. पटेल महाविद्यालयात "ट्रॅडिशन्स इन इंडियन लिटरेचर्स" या इंग्रजी पुस्तकाचे प्रकाशनप्रसंगी उपस्थित प्राचार्य डॉ. जगदीश पाटील, प्रा. डॉ. भूपेंद्र केसुर, डॉ. वर्षा पाटील, डॉ. गजानन पाटील, प्राचार्य डॉ. एच. एस. महाजन, प्रा. लिलाधर पाटील आदी.*

## संपादकीय

# शंभरी गाठलेल्या संघाची सर्वव्यापी हाक

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्थापक आद्य सरसंघचालक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार यांचे संघ आणि समाज वेगळे असू नयेत, ते एकरूप व्हावेत, हे ध्येय होते. ते पूर्ण व्हावे, यासाठी शंभरी गाठलेला संघ जराही न थकता नवा पट साकारू बघतो आहे. शंभर वर्षांच्या वाटचालीचे संचित आता दिसू लागले आहे. एखादी संघटना दशदिशांनी विस्तारणे हे संस्था जीवनाचा एकूण आवाका पाहिला, तर आश्चर्यचकित करणारे आहे. बोचरी टीका, कमालीची उपेक्षा आणि टोकाची अवहेलना सहन करीत वाटचाल करणाऱ्या संघ कार्याला आता सर्वव्यापी व्हायचे आहे. शंभर वर्षांच्या या वाटचालीत बंदीच्या वेळा आल्या, गैरसमजावर आधारलेली टीका झाली. एकीकडे कार्य विस्तारत गेले, तसे दुसरीकडे टिकेचे स्वर टिपेला गेले. 'सर्वेषाम अविरोधेन' म्हणजे कुणाचाही विरोध नको ही भूमिका असल्याने संघ शांतपणे विस्तार करत राहिला. मुंबईत समाजातील 'हुज हू'शी संवाद साधताना सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी अत्यंत व्यापक भूमिका घेत भारताच्या भल्यासाठी काम करणारा प्रत्येकजण आपलाच अशी मांडणी केली आहे. हे फार मोठे विधान आहे. आमचाच विचार मान्य करा, अशी सक्ती न करता तुम्ही चांगले काही करत असाल, तर आम्ही तुम्हाला 'शाब्बास' म्हणू असे सांगत भागवतांनी प्रत्येक समाजोपयोगी कामाची स्वीकारार्हता मान्य केली आहे. आमच्यात या, संघ शाखेत स्वागत आहे, आम्हाला बघा, आमचे काम अजमावा असे आवाहन करतानाच तशी तयारी नसेलच, तर हरकत नाही, भारताला बलशाली करण्याचे काम आपापल्यापरीने करत राहा, संघाला तुमचे कौतुक असेल अशी अतिव्यापक मांडणी या संवादाचे विशेष होते. नाकारली, हिणवली जाणारी हिंदुत्ववादी विचारधारा गुरुस्थानी मानणाऱ्या पक्षाचे, भारतीय जनता पक्षाचे सरकार केंद्रात राज्य करत आहे. बऱ्याच राज्यांत या पक्षाची सत्ता आहे. नेमक्या याच कालावधीत आधीच्या राजवटींनी केलेल्या प्रयत्नांना फळ मिळून भारत आर्थिक महासत्ता होऊ पाहते आहे.

प्रतिकूल परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी सतत झटणाऱ्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला अशा अनुकूल वातावरणात भारताचा विश्वगुरू करावे, असे वाटत असेल, तर तो त्यांच्या निष्ठेने काम करण्याचा भाग आहे. त्यात काही गैर नाही. संघ कार्याला त्यासाठी भारतात सर्वमान्यता मिळविणे आवश्यक असेल. हे फारसे सोपे नसल्याची जाणीव संघाला आहे. आम्ही कोण, हे जनतेने जाणून घ्यावे, यासाठी संघाचे नेतृत्व या शताब्दी वर्षात विविध समाजगटांशी संवाद साधू पाहते आहे. चार महानगरांतील मान्यवरांशी संवाद हा त्यामुळेच महत्त्वाचा. आपल्याला महासत्ता नव्हे, तर विश्वगुरू व्हायचे आहे, हेही सरसंघचालकांनी स्पष्ट केले आहे. खरे तर विश्वगुरू होण्याचा किंवा महासत्ता होण्याचा खरा अर्थ काय, यावर वाद होऊ शकतील. ज्या देशात शेतकरी कारण नसताना आत्महत्या करतात किंवा बालके कुपोषित आहेत, महिलांवरील अत्याचारांच्या प्रमाणात फारशी घट नाही, विषमतेचे थैमान आहे, श्रीमानवर्गालाही वाहतूक कोंडी, भ्रष्ट व्यवस्थेचा सामना करावा लागतो आहे, तेथे बऱ्याच बदलाची गरज आहे. विश्वगुरू किंवा महासत्ता होणे या केवळ काही वर्गासाठी रोमँटिक कल्पना आहेत काय, हा मुद्दा आहेच. या मुद्द्याला हाताशी धरून विरोध होत असतो. उजव्या परिवाराच्या वाढीला विरोध करणारी वैचारिक आंदोलने विश्वगुरू कल्पनेची खिल्लीही उडवतात; मात्र या वैचारिक आंदोलनांची शक्ती अत्यंत क्षीण असल्याने सध्या भारतातील विस्तारणाऱ्या मध्यमवर्गीय समाजाचा आणि राजकीय वर्तमानाचा स्वर हा संघ परिवाराला पाठिंब्याचा आहे. संघ परिवार या वर्गाला संघटित करतानाच विरोधकांच्या आक्षेपांवर मात करत सर्वसमावेशक कसे होता येईल आणि हिंदू राष्ट्राला परम वैभवाला कसे पोहोचवता येईल, याचा विचार करताना दिसतो आहे.

शताब्दी वर्षामध्ये सरसंघचालक डॉक्टर मोहन भागवत यांनी चार महानगरांत आयोजित केलेली व्याख्यानमाला ही या संवाद प्रयत्नांचा भाग होती. मुंबईत धर्मगुरू, वैज्ञानिक, प्रशासकीय अधिकारी, न्यायवृंद, कलावंत, माध्यमप्रमुख या समाजावर प्रभाव टाकणाऱ्या महत्त्वाच्या व्यक्तींसमवेत भटके विमुक्त, पाथरवट अशा समुदायांनाही बोलावले गेले होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला नीती निर्धारावर तसेच अर्थकारणावर पकड असलेल्या लोकांना विश्वासात घेणे आता आवश्यक वाटते आहे. हे आवश्यक वाटणे हे एका अर्थाने योग्यच आहे. वाद असतील, तरी त्याबद्दल संवाद करता येणे ही समाजाला मोठे करण्याची एक प्रक्रिया आहे. या प्रक्रियेला चालना देण्यासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने दिल्ली, चेन्नई, कोलकाता आणि याच मालिकेतला शेवटचा संवाद मुंबईमध्ये आयोजित केला. मुंबईतील नामचीन मंडळी या संवादासाठी विशेषत्वाने आमंत्रित केली गेली होती. या संवादात सरसंघचालक मोहन भागवत जे म्हणाले ते फार महत्त्वाचे. पूर्वीपासूनच संघ समाजाचे केवळ दोन वर्ग करतो. एक वर्ग म्हणजे आज स्वयंसेवक असलेला आणि दुसरा उद्या स्वयंसेवक होणारा. या चिवट आशावादामुळे संघाचे काम प्रतिकूल परिस्थितीत वाढले, हे विरोधकांनाही नाकारता येणार नाही. आता व्याप्ती आधुनिक काळाला अनुसरून मोठी करायची हा निर्णय संघाने घेतलेला दिसतो. मुंबईतील महत्त्वाच्या व्यक्तींशी संवाद साधताना सरसंघचालक भागवतांनी स्वयंसेवक आणि संघहितैषी यांना चार वर्गवारीत विभाजित केले. त्यातील पहिला वर्ग म्हणजे स्वयंसेवक असलेला, दुसरा संघाच्या कामाबद्दल आस्था असलेला, तिसरा संघाशी थेट संबंध नसलेल्या कामात गुंतलेला आणि चौथा संघाशी कोणताही संबंध नसतानाही उत्तम काम करणारा. हे सर्व वर्ग आपलेच आहेत आणि संघात या सर्व वर्गवारींचे स्वागत आहे, असा संदेश मोहन भागवतांनी या व्याख्यानांमधून दिला. भारताच्या भल्यासाठी जो जो काम करत असेल, तो तो आमचाच, तो आपलाच असे म्हणण्याची आमची तयारी असल्याचे मोहन भागवत यांनी जमलेल्या मंडळींच्या मार्फत सर्वांना सांगून टाकले. या विधानाची संघाच्या विरोधकांनी कितपत दखल घेतली की आता अशी विरोध विचारधारा जुन्याच गृहितकात अडकली आहे? या विधानातील अर्थ त्यांना जाणून घ्यायचा आहे काय, हा अतिशय महत्त्वाचा मुद्दा आहे.





*अमळनेर : राष्ट्रसंत गाडगेबाबा जयंतीनिमित्त श्री गाडगेबाबा चौकात अभिवादन करताना दीपक वाल्हे, अनिल वाघ, रवींद्र जाधव, लक्ष्मण परदेशी व समाजबांधव. दुसऱ्या छायाचित्रात राष्ट्रसंत गाडगेबाबा उद्यानात स्मारकावर अभिवादन करताना समाजबांधव.*

# राष्ट्रसंत गाडगेबाबा जयंतीनिमित्त मिरवणूक उत्साहात

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथे व परिसरात राष्ट्रसंत गाडगेबाबा जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम उत्साहात साजरे झाले. शहरातून मिरवणुकही काढण्यात आली. अनेक ठिकाणी स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

वाडी चौक येथून गाडगे बाबाच्या पूर्णाकृती प्रतिमेचे पूजन करून भव्य मिरवणुकीला उत्साहात सुरुवात करण्यात आली. मिरवणूक मार्गावर ठिकठिकाणी रांगोळ्या काढण्यात आल्या होत्या. दीपक वाल्हे, अनिल वाघ, रवींद्र जाधव, लक्ष्मण परदेशी आदींसह समाजबांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. टाळ-मृदंगाच्या गजरात व राष्ट्रसंत गाडगे बाबांच्या जयघोषाने मिरवणूक मार्ग दुमदुमला होता. वाडी चौक, सराफ बाजार, दगडी दरवाजा, राष्ट्रसंत गाडगेबाबा चौकमार्गे गाडगेबाबा उद्यानात मिरवणुकीचा सांगता झाली. यावेळी गाडगेबाबांना अभिवादन करण्यात आले. राष्ट्रसंत गाडगेबाबा स्मारकाजवळ आरती व प्रतिमा पूजन करून कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी परीट धोबी समाजाचे आजी-माजी पदाधिकारी, युवा परिट धोबी समाज मंडळाचे कार्यकर्ते तसेच महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. प्रा. सुभाष जिभाऊ पाटील, नगराध्यक्ष डॉ. परिक्षित बाविस्कर, नगरसेवक रामकृष्ण पाटील, माजी नगराध्यक्षा सौ. जयश्रीताई पाटील, अशोक बिऱ्हाडे, सामाजिक कार्यकर्ते सुरजभाऊ परदेशी, विक्रांत पाटील, नाना धनगर, मनोहरनाना पाटील, अरुण देशमुख आदी उपस्थित होते. गाडगेबाबांच्या विचारांची प्रेरणा घेऊन स्वच्छ, सुजाण आणि सुसंस्कृत समाज घडविण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

# राहुल धनगर यांचा प्रामाणिकपणा

## बसमध्ये सापडलेला मोबाईल शिक्षकाला केला परत

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील ओमकार नगरमधील राहुल धनगर जळगावहून अमळनेरला परतत असताना त्यांना बसमध्ये एका शिक्षकाचा मोबाईल सापडला. तो त्यांनी मूळ मालकाचा शोध घेऊन ट्राफिक पोलीस यांचे समक्ष परत करून आपल्या प्रामाणिकपणाचे दर्शन घडविले. त्यांच्या प्रामाणिकपणाबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.



राहुल धनगर हे जळगावहून बसने अमळनेरला येत होते. प्रवासादरम्यान त्यांना बसच्या सीटवर एक मोबाईल फोन सापडला. काही वेळातच त्या फोनवर जळगाव येथील एका शिक्षकाचा कॉल आला. राहुल यांनी तातडीने प्रतिसाद देत तो फोन त्यांचाच असल्याची खात्री पटवून घेतली आणि संबंधित शिक्षकाला भेटून पोलिसांसमक्ष तो सुपूर्द केला. हरवलेला मोबाईल सुस्थितीत परत मिळाल्याने संबंधित शिक्षकाने राहुल यांचे आभार मानले. "आजच्या काळात तुमच्यासारखी प्रामाणिक माणसे आहेत म्हणूनच माणुसकी टिकून आहे," अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या. कृतज्ञता म्हणून शिक्षकांनी राहुल यांना १ हजसा रुपयांचे बक्षीस देऊ केले. मात्र "हे माझे कर्तव्य होते" असे सांगून राहुल यांनी ते पैसे घेण्यास नम्रपणे नकार दिला. रेल्वेत कार्यालय अधीक्षक असलेले राहुल धनगर हे येथील ओमकार नगर भागातील रहिवासी असून ते परिसरात एक सक्रिय युवा कार्यकर्ता म्हणून परिचित आहेत. ओमकार नगर व शेजारील कॉलनीत सामाजिक उपक्रम असो वा सार्वजनिक कार्यक्रम असो राहुल धनगर यांचा सहभाग आणि धावपळ नेहमीच अग्रस्थानी असते.

# रूग्णवाहिका चालकाने दिले हरिणीला जीवदान

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील रूग्णवाहिका चालकाने जखमी हरिणीचे प्राण वाचविले आहेत. त्यांच्या हजरजबाबीपणाचे वन्यप्रेमींमधून कौतुक होत आहे. ही घटना सोमवार, दि. २३ फेब्रुवारी रोजी रात्री घडली होती.



घटनेची माहिती, अशी की खासगी रुग्णवाहिका चालक आकाश पाटील हे एका रुग्णाला धुळे येथे सोडून अमळनेरकडे परतत होते. रात्रीच्या सुमारास चोपडाई-कोंडावळ आणि उदयनगर दरम्यान एका रस्त्याच्या कडेला त्यांना एक हरिणी जखमी अवस्थेत पडलेली दिसली. अज्ञात वाहनाच्या धडकेत हरिणी गंभीर जखमी झाले होती. रस्त्यावर जखमी अवस्थेत पडलेल्या मुक्या प्राण्यास पाहून आकाश पाटील यांना गहिवरून आले. त्यांनी क्षणाचाही विलंब न लावता रुग्णवाहिका थांबवली. जवळ जाऊन पाहिले असता, ती हरिणी गर्भवती असल्याचे त्यांच्या लक्षात आले. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून त्यांनी तातडीने त्या हरिणीला रुग्णवाहिकेत टाकले आणि थेट अमळनेर येथील पशुवैद्यकीय दवाखाना गाठला. पशुवैद्यकीय दवाखान्यातील अधिकाऱ्यांनीही तातडीने उपचार सुरु केले. त्यामुळे हरिणीचे आणि तिच्या पोटातील पिलाचे प्राण वाचले. या घटनेची माहिती मिळताच वनविभागाचे अधिकारी देसले यांनी आकाश पाटील यांची भेट घेऊन त्यांचे कौतुक केले.

# छत्रपती शिवाजी महाराज नेमके कसे दिसायचे?

## समकालीन प्रवाशांच्या नोंदी,

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**


छत्रपती शिवाजी महाराजांच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल जनमानसात प्रचंड आकर्षण आहे. मात्र, महाराज नेमके कसे दिसत होते, याचा शोध घेताना आपल्याला समकालीन परकीय प्रवासी, मुत्सद्दी आणि इतिहासकारांच्या नोंदींचा आधार घ्यावा लागतो. उपलब्ध वर्णने, नोंदी आणि तत्कालीन रेखाचित्रांवरून काही महत्त्वाचे संकेत मिळतात.

**समकालीन परकीय प्रवाशांची नोंद**

हेन्री ऑक्सेंडन इंग्रज दूत म्हणून १६७४ च्या राज्याभिषेकावेळी उपस्थित होता. त्याच्या नोंदींनुसार महाराज मध्यम उंचीचे, बांध्याने सुदृढ, चेहऱ्यावर तेज आणि डोळ्यांत तीक्ष्णता असलेले होते. त्यांचा दरारा आणि आत्मविश्वास लगेच जाणवायचा.

फ्राँस्वा बर्निए फ्रेंच प्रवासीने महाराजांचे वर्णन चपळ, बुद्धिमान आणि प्रभावी व्यक्तिमत्त्वाचे असे केले आहे. तो विशेषतः त्यांच्या राजनैतिक कौशल्यावर आणि संयमी स्वभावावर भर देतो.

निकोलाओ मनुच्ची इटालियन प्रवासी. त्याच्या लिखाणात महाराजांचा स्वच्छ पोशाख, व्यवस्थित दाढी-मिश्या आणि शिस्तबद्ध दरबार यांचा उल्लेख आढळतो.



या तिन्ही नोंदींमधून एक गोष्ट स्पष्ट होते, की महाराजांचे व्यक्तिमत्त्व केवळ शारीरिक नव्हते. त्यांचा करारी स्वभाव, बुद्धिमत्ता आणि नेतृत्वगुण हेच त्यांच्या रूपाचे खरे वैशिष्ट्य होते.

**उपलब्ध चित्रसाक्षी**

महाराजांच्या आयुष्यातील प्रत्यक्ष छायाचित्र उपलब्ध नाहीत (कारण त्या काळात छायाचित्रण नव्हते). मात्र काही डच/युरोपीय कलाकारांनी काढलेली रेखाचित्रे आणि नंतरच्या काळातील चित्रकारांनी केलेली चित्रे उपलब्ध आहेत. ही चित्रे वर्णनांवर आधारित असल्याने त्यात थोडाफार फरक आढळतो; तरीही उभट नाक, टोकदार दाढी, भेदक डोळे ही वैशिष्ट्ये सातत्याने दिसतात. छत्रपती शिवाजी महाराजांचे खरे "रूप" हे केवळ शारीरिक वर्णनात मर्यादित नाही. त्यांच्या दूरदृष्टी, शौर्य, संघटनकौशल्य आणि स्वराज्याची तळमळ यांतच त्यांचे व्यक्तिमत्त्व प्रकट होते. समकालीन प्रवाशांच्या नोंदींवरून ते मध्यम उंचीचे, तेजस्वी, करारी आणि प्रभावी व्यक्तिमत्त्वाचे होते, हे स्पष्ट होते.

इतिहासाच्या दृष्टीने पाहतामहाराजांचे रूप जितके तेजस्वी, तितकेच त्यांचे कार्य अधिक उज्ज्वल आहे.

### बांधा आणि शारीरिक वैशिष्ट्ये

- उंची : मध्यम
- बांधा : सुदृढ, चपळ
- चेहरा : गोरा-गव्हाळ वर्ण, उभट नाक
- डोळे : तेजस्वी आणि भेदक
- दाढी-मिश्या : नीटनेटके, व्यवस्थित ठेवलेले

अनेक वर्णनांमध्ये त्यांच्या डोळ्यांतील तेज आणि चेहऱ्यावरील आत्मविश्वास विशेषत्वाने नमूद आहे.

### वेषभूषा आणि दैनंदिन स्वरूप

- डोक्यावर मावळा पगडी / जिरटोप
- अंगावर रेशमी अंगा-रखा किंवा झगा
- कंबरेला पट्टा व शस्त्रसज्जता
- गळ्यात मोत्यांची माळ किंवा अलंकार
- महाराजांची वेशभूषा साधेपणासह राजेशाही दर्शवणारी होती. युद्धकाळात ते हलक्या, सोयीस्कर पोशाखात असत; तर दरबारात समारंभानुसार राजेशाही पोशाख धारण करत.

# अंगातला शर्ट कार्यकर्त्यास देणारे राजकारणातील 'दादा' कोण?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

वसंतदादा पाटील पहिल्यांदा मुख्यमंत्री झाल्यानंरची एक घटना आहे. सांगली-इस्लामपूर रस्त्यावरून एक ट्रक चाललेला. ट्रकमधले लोक वसंतदादा पाटील यांच्या विजयाच्या घोषणा देत निघाले होते. रानातून घरी चाललेल्या एकाने त्या ट्रकला हात करत विचारले.

"काय झालं?"

"आरं, आपलं दादा मुख्यमंत्री झाल्यातीं" ट्रकमधल्या माणसानं सांगितलं.

"आपल वसंतदादा?"

"होय.''

"मग चला मीबी येतो''

"आर पण तुझ्या अंगावर ही रानातली कापड हायती"

"त्येला काय हुतंय. आपुन दादास्नीच भेटायचं हाय. दादा आपलच हायती."

असं म्हणत तो माणूस अंगावर असणाऱ्या फाटक्या बंडीवर आणि मळक्या धोतरावर मुंबईला निघाला . शेकडो मैलाचा प्रवास करून ही गावाकडची माणस दादांच्या बंगल्यावर पोहaचली. दादा अजून येणार होते म्हणून वाट पाहत बैठकीच्या खोलीत बसली. काही वेळानं दादा आले. आल्या-आल्या त्यांचे लक्ष या नुसत्या बंडीवर आलेल्या कार्यकर्त्याकडे गेले. दादांनी त्याला विचारलं,

"हरिबा असा कसा आलायस? तुझा शर्ट कुठं आहे?"

"दादा, तुम्ही मुख्यमंत्री झालेलं रस्त्यात कळलं. आता घरी कवा जावू आणि कापड कवा घालू? तवर ही माणसं निघून आली असती. म्हणून तसाच आलू."

ते ऐकून दादा हेलावले.


त्यांनी लगेच त्याच ठिकाणी आपल्या अंगातील शर्ट काढला आणि त्या हरीबाला घालायला दिला. दादा आत गेले. दुसरा शर्ट घालून आले.

आपल्या कार्यकर्त्याचे भोळे भाबडे प्रेम पाहून त्याला आपल्या अंगातील शर्ट काढून देणारे वसंतदादा हे लोकांना आठवत राहतात.

आणि...

त्यांच्या साधेपणाच्या कथा आजही घराघरातून सांगितल्या जातात.

आजचे नेते सामान्य माणसांच्या प्रश्नांला फारसे महत्व देत नाहीत. एखादा गरीब माणूस जर स्वतःची समस्या घेऊन



नेत्याकडे गेला तर नेता बोलायच्या अगोदरच नेत्याच्या भोवती बसलेले त्याचे अनुयायीच त्या माणसावर खेकसतात. म्हणतात, ''हे काम सायेबांना सांगतोयस?काय किमंत घालवतोय काय आमच्या सायेबांची"

हे अनेकांनी अनुभवलेलं असतं.

साहेब आणि त्यांच्या अनुयायांना किरकोळ वाटणार काम त्या माणसासाठी खूप महत्त्वाचं असतं. अशा आजकालच्या साहेबांच्यासाठी आणि त्याच्या भोवतीच्या लोकांसाठी वसंतदादा पाटील यांचा एक किस्सा आवर्जून सांगितला पाहिजे.

एकदा काय झालं दादांचा एका बालमित्राला विहिरीवर बसवायचं इंजिन घ्यायचं होतं. तो पैसे फेट्यात बांधून थेट मुंबईला गेला. चौकशी करत-करत दादांच्या बंगल्याच्याजवळ गेला. त्याला पोलीस आत सोडत नव्हते. तो तिथंच उभा राहिला. योगायोगानं दादा कुठेतरी बाहेर निघालेले...

या मित्रानं त्यांना जोरानं हाक मारली-

"वसंता है...

ती गावाकडच्या माणसाची हाक ऐकून दादांनी मागे वळून पाहिले. दादा त्याच्याकडे आले.कडकडून मिठी मारली. ज्या पोलिसांनी त्याला अडवले होते. ते हा प्रसंग पाहून चकित झाले. अधिकारीही अवाक झालेले. राज्याचे मुख्यमंत्री एका शेतकऱ्याची गळाभेट घेत होते.

त्यांनी विचारलं

"अस अचानक कसा आलास?"

"वसंता, गेल्यासाली हिर पाडली. पाणी लागलंय चांगल.औंदा इंजन बसवायचं हाय. तुझ्या ओळखीन म्हटलं चांगलं इंजेन मिळलं,म्हणून आलूया"असं म्हणत त्यांनी फेट्यातला नोटांचा पुडका दादांच्या हातात दिला.दादा त्याला म्हणाले,"राहूदे ठेव तुझ्याजवळ. आता आलास तर दोन दिवस रहा"

त्या गावाकडच्या मित्राला आपण इंजिन खरेदी करायचं काम मुख्यमंत्र्यांना सांगतोय याच काहीही वाटत नव्हतं. कारण दादा त्याला आपले वाटत होते. आणि दादानाही त्यानं हे काम सांगितलं यात कसलाही कमीपणा वाटत नव्हता...

दादा हे दादाच होते....

दादांनी त्याच इंजिन घेऊन त्याच्या घरी पाठवलं.आणि सांगलीला जाताना त्याला सोबत घेऊन गेले.

विशेष म्हणजे दादांनी ही गोष्ट जाहीर सभेत कधी सांगितली नाही. प्रचारात सांगितली नाही, या घटनेची जाहिरात केली नाही. कारण अशा कित्येक गोष्टी होत्या सागण्यासारख्या.....

कोणकोणत्या गोष्टी सांगायच्या?

आजचे नेते असे वागत नाहीत. आणि चुकून कोणी वागले तर त्याची बातमी होते. दादांच्या आयुष्यात बातमी बनण्यासारख्या शेकडो गोष्टी घडल्या. पण त्याच्या बातम्या झाल्या नाहीत. पण आदरणीय दादांच्या त्या सगळ्या आठवणी लोकांनी अंतःकरणात जपून ठेवल्या आहेत.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com




# श्री विष्णुसहत्रनाम स्तोत्राचा महिमा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

विष्णुसहस्त्रनाम स्तोत्रमध्ये आपल्या जीवनात उपयोगी येणारे काही मंत्र दडलेले आहेत. सदरचे मंत्र आपल्या रोजच्या जीवनात किती उपयोगी आहेत, त्याचा उपयोग का व करावा हे जाणून घेऊयात...

**०१) पोटाचे विकार दुर होण्यासाठी खालील मंत्र म्हणावा.**
॥ भ्राजिष्णुर्भोजनं भोक्ता सहिष्णुर्जगदादिजः ॥
॥ अनघो विजयो जेता विश्वयोनिः पुनर्वसुः ॥१६

**०२) मानसिक विकार दुर होण्यासाठी खालील मंत्र म्हणावा.**
॥ वैद्यो वैद्यः सदायोगी वीरहा माधवो मधुः ॥
॥ अतीन्द्रियो महामायो महोत्साहो महाबलः ॥१८

**०३) स्मरणशक्ती वाढण्यासाठी खालील मंत्र म्हणावा.**
॥ महाबुद्धिर्महावीर्यो महा शक्तीर्महाद्युतिः ॥
॥ अनिर्देश्यवपुः श्रीमान् अमेयात्मा महाद्रिधृक ॥ १९

**०४) इच्छापुर्ण होण्यासाठी खालील मंत्र म्हणावा.**
॥ असङ्ख्येयोऽप्रमेयात्मा विशिष्टः शिष्टकृच्छुचिः ॥
॥ सिद्धार्थःसिद्धसङ्कल्पः सिद्धिदः सिद्धिसाधनः ॥ २७

**०५) रोग देशाकरिता खालील मंत्र म्हणावा.**
॥ अमृतांशूद्भवो भानुःशशबिन्दुः सुरेश्वरः ॥
॥ औषधं जगतः सेतुः सत्यधर्मपराक्रमः ॥ ३१

**०६) कार्यात यश मिळण्यासाठी खालील मंत्र म्हणावा.**
॥ भूतभव्यभवन्नाथः पवनः पावनऽनलः ॥
॥ कामहा कामकृत्कान्तः कामः कामप्रदः प्रभुः ॥ ३२

**०७) विजय मिळविण्यासाठी खालील मंत्र म्हणावा.**
॥ युगादिकृद्युगावर्तो नैकमायो महाशनः ॥
॥ अदृश्यो व्यक्तरूपश्च सहस्रजिदनन्तजित ॥ ३३

**०८) नोकरीत व व्यवसायात वाढ होण्यासाठी खालील मंत्र म्हणावा.**
॥ व्यवसायो व्यवस्थानः संस्थानः स्थानदो ध्रुवः ॥
॥ परर्द्धिःपरमस्पष्टस्तुष्टःपुष्टः शुभेक्षणः ॥ ४२

**०९) साधनेतील बाधा कमी होण्यासाठी खालील मंत्र म्हणावा.**
॥ वैकुण्ठः पुरुषः प्राणः प्राणदः प्रणवः पृथुः ॥
॥ हिरण्यगर्भः शत्रुघ्नो व्याप्तो वायुरधोक्षजः ॥ ४४

**१०) संकटात रक्षण होण्यासाठी खालील मंत्र म्हणावा.**
॥ ऋतुःसुदर्शनः कालः परमेष्ठी परिग्रहः ॥
॥ उग्रः संवत्सरो दक्षो विश्रामो विश्वदक्षिणः ॥ ४५

**११) अर्थ प्राप्तीसाठी आपण खालील मंत्र म्हणावा.**
॥ विस्तारः स्थावरस्थाणुः प्रमाण बीजमव्ययम् ॥
॥ अर्थोऽनर्थो महाकोशो महाभोगो महधनः॥ ४६

**१२) कल्याण होण्यासाठी खालील मंत्र म्हणावा.**
॥ अनिवर्ती निवृत्तामा सङ.क्षेप्ता क्षेमकृच्छिवः॥
॥ श्रीवत्सवक्षाः श्रीवासः श्रीपतिः श्रीमतांवरः॥ -६४

**१३) देवाची कृपा होण्यासाठी खालील मंत्र म्हणावा.**
॥ श्रीदः श्रीशः श्रीनिवासः श्रीनिधिः श्रीविभावनः॥
॥ श्रीधरः श्रीकरः श्रेयः श्रीमाँल्लोकत्रयाश्रयः॥ ६५

**१४) विवाह योग येण्यासाठी खालील मंत्र म्हणावा.**
॥ कामदेवः कामपालः कामी कान्तः कृतागमः॥
॥ अनिर्देश्यवपुर्विष्णुर्वीरोऽनंतो धनञ्जयः॥ ७०

**१५) ज्ञान होण्यासाठी खालील मंत्र म्हणावा.**
॥ ब्रह्मण्यो ब्रह्मकृद् ब्रह्मा ब्रह्म ब्रह्मविवर्धनः॥
॥ ब्रह्मविद् ब्राह्मणो ब्रह्मी ब्रह्मज्ञो ब्राह्मणप्रियः॥ ७१

**१६) मोक्षाकरिता खालील मंत्र म्हणावा.**
॥ सद्गतिः सत्कृतिः सत्ता सद्भूतिः सत्परायणः॥
॥ शुरसेनो यदुश्रेष्ठः सन्निवासः सुयामुनः॥ ७५

**१७) वासनांचा नाश करण्यासाठी खालील मंत्र म्हणावा.**
॥ भूतावासो वासुदेवः सर्वासुनिलयोऽ नलः॥
॥ दर्पहा दर्पदो दृप्तो दुर्धरोथाऽपराजितः॥ ७६

**१८) शत्रूची पीडा कमी होण्यासाठी खालील मंत्र म्हणावा.**
॥ सुलभः सुव्रतः सिद्धः शत्रुजिच्छत्रुतापनः॥
॥ न्यग्रोधोदुम्बरोऽ श्वत्थश्चाणूरान्ध्रनिषूदनः॥ ८८

**१९) चिंता दुर होण्यासाठी खालील मंत्र म्हणावा.**
॥ सहस्रार्चिः सप्तजिह्वः सप्तैधाः सप्तवाहनः॥
॥ अमूर्तिरनघोऽचिन्त्यो भयकृद्भयनाशनः॥ ८९

**२०) वाईट स्वप्नांचा नाश होण्यासाठी खालील मंत्र म्हणावा.**
॥ उत्तारणो दुष्कृतिहा पुण्यो दुःस्वप्ननाशनः॥
॥ वीरहा रक्षणः सन्तो जीवनः पर्यवस्थितः॥ ९९

# नर्मदा नदीची कहाणी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मध्य प्रदेशात १०७० कि.मी. पूर्वेकडू पश्चिम दिशेकडे वाहणारी नर्मदा नदी ही म. प्र.ची जीवनरेषा तर आहेच पण अत्यंत पवित्र नदी म्हणून ओळखली जाते. यमुनेत सात दिवस, गंगेत एक दिवस, सरस्वतीत तीन तास स्नान केल्यावर व्यक्ती पवित्र होतो. पण जर नर्मदेत एक डुबकी लावली तर तो व्यक्ती पवित्र होतो, हे नर्मदेचे वैशिष्ट्य आहे. कितीही लांबचा प्रवास करून या व जसे नर्मदा नदीचे पात्र दिसले की मन प्रसन्न होते व एका डुबकीत सगळा थकवा नाहीसा होतो. चिरकुमारिका नर्मदा व तिचे ते सात्विक सौंदर्य चारीत्रिक तेज मन मोहून घेते. ही नदी कुमारिका म्हणून प्रसिद्ध आहे. अनेक लोकगीतांत व पौराणिक कथेत नर्मदा कुमारिका का? याबद्दल कथा आहेत.

भगवान महादेव यांच्या घामापासून एक अत्यंत रूपवती कन्या जन्मास आली. तिला 'नर्मदा' या नावाने सर्व ओळखू लागले. लहान असताना आपले पिताश्री ध्यानस्त बसलेले पाहून ही कन्या त्यांच्यासमोर बसून त्यांचे ध्यान करू लागली. महादेवांनी पाहिले एक बालिका त्यांच्यापुढे बसलेली आहे. सर्वज्ञानी शिव यांनी तिला ओळखले व प्रेमाने मांडीवर बसवून तिला आशीर्वाद दिला, की तू जगातील सर्वांत ताकदवार होशील. प्रलयाचा तुझ्यावर परिणाम होणार नाही. नर्मदा म्हणजे सर्वांना सुख देणारी, तुझ्या स्पर्शाने लोकांची पापे धुतली जातील, तुझ्यात सापडणारा प्रत्येक दगड शिवलिंग होईल व त्याची स्थापना न करता पार्थिव पूजा करता येईल. मैकल पर्वतातून या नदीचा उगम झाल्याने ही मैखल राजाकडे जन्मास आली. अत्यंत तेजस्वी व रूपवती कन्या मिळाल्याने राजा खूप खूश झाला व अत्यंत प्रेमाने तिचे पोषण करू लागला. जेव्हा ती लग्नाच्या योग्य झाली तेव्हा राजाने अशी अट ठेवली की जो राजकुमार गुलदावलीची फुले आणेल त्याच्याशी नर्मदा विवाह करेल. मग ही अट पुरी करावयास एक सोनभद्र नावाचा राजकुमार पुढे आला व त्याने



ही अट पुरी केली.

सोनभद्र हा देखणा व पराक्रमी राजकुमार होता. इकडे नर्मदेस सोनभद्राबद्दल कळले व विवाहाआधी त्याला भेटावे व वार्तालाप करावा, अशी मनीषा ठेवून तिने आपली दासी जिव्हाला हीस भेटून आपली इच्छा कळविण्यास सांगितले. जिव्हाने एवढ्या मोठ्या राजकुमारला भेटायचे म्हणजे चांगले कपडे व दागिने मागितले. नर्मदेने आपले कपडे व दागिने तिला दिले. जेव्हा जिव्हा सोनभद्राकडे आली तेव्हा तिला नर्मदा समजून सोनभद्र तिच्याकडे आकृष्ट झाला व लग्नाचा प्रस्ताव करता झाला. आदिवासी कन्या जिव्हा पण त्याच्यावर भाळली व लग्नास तयार झाली. इकडे बरीच वाट पाहून जिव्हा नाही आली. तिला पाहण्यासाठी स्वतः नर्मदा तेथे गेली. तेथे जिव्हा सोनभद्राबरोबर प्रणयक्रीडेत मग्न पाहून उलटपावली परत आली. पाहिलेल्या प्रकारामुळे व्यथित व अपमानित झालेली नर्मदा आता लग्न करणार नाही, हा निश्चय करून परत त्या दिशेस गेली नाही.

या पौराणिक कथेला भौगोलिक पुरावाही आहे. नदीचे पुल्लिंग नद असे आहे. जसे ब्रह्मपुत्राला नद म्हणून ओळखले जाते. तसेच सोनभद्राला नद म्हणून ओळखतात. जैसिंगपूरच्या बेरहा गावी दशरथ घाटावर जिव्हा (अपवित्र नदी) व सोनभद्र नद यांचा संगम आहे व नर्मदा उलट्या दिशेने निघून गेली आहे. सोनभद्राबरोबरच्या या प्रसंगाने अत्यंत अपमान झालेली नर्मदा जन्मभर कुमारिका राहण्याच्या निर्णयाने तरुणपणातच संन्यासिनी झाली व पश्चिम दिशेकडे मोठे-मोठे पहाड, दांट जंगल पार करून अरबी समुद्रात समाविष्ट झाली. तसे पाहिले तर सर्व मोठ्या नद्या पश्चिमेकडून पूर्वेकडे वाहून बंगालच्या समुद्रात मिळतात. एकटी नर्मदा मात्र अरबी समुद्रात मिळते. नर्मदा ही एक मात्र मोठी नदी आहे जिला आपण प्रदक्षिणा घालू शकतो. तिला तसा आशीर्वाद भगवान महादेव यांनी दिला आहे. हजारो भाविक नर्मदा प्रदक्षिणा पूर्ण करून पावन झाले आहेत. नर्मदेच्या दोन्ही किनाऱ्यांवर संत व महात्मा वास करत आहेत. अशा या पवित्र नदीला 'देवी नर्मदा' असे संबोधले जाते व तिची सकाळ-सायंकाळ आरती केली जाते.

# देवळात गेल्यावर दर्शन कसे घ्यावे?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

१) देवळात प्रवेश करण्यापूर्वी शक्य असल्यास पाय धुवावेत.
२) देवळाच्या आवारातून कळसाला नमस्कार करावा.
३) देवळाच्या पायऱ्या चढताना उजवा हात लावून पायरीला नमस्कार करावा.
४) 'देवतेला जागृत करत आहोत', या भावाने घंटा अतिशय हळू वाजवावी.
५) देवतेचे दर्शन घेण्यासाठी देवतेची मूर्ती आणि तिच्या समोर असलेली कासवाची प्रतिकृती यांच्यामध्ये, तसेच शिवालयात पिंडी अन् तिच्या समोर असलेली नंदीची प्रतिकृती यांच्यामध्ये उभे न रहाता किंवा न बसता कासव किंवा नंदी यांची प्रतिकृती आणि देवतेची मूर्ती किंवा पिंडी यांना जोडणाऱ्या रेषेच्या अंगाला उभे राहावे. शिवालयात पिंडीचे दर्शन घेण्यापूर्वी नंदीच्या दोन्ही शिंगांना हात लावून नंदीचे दर्शन घ्यावे. याला 'शृंगदर्शन' असे म्हणतात.
६) देवतेच्या चरणांशी दृष्टी ठेवून लीन व्हावे. देवतेच्या छातीशी मन एकाग्र करावे. शेवटी देवतेच्या डोळ्यांकडे पाहून तिचे रूप डोळ्यांत साठवावे.
७) देवतेला अर्पण करावयाची वस्तू (उदा.- फुले) देवतेच्या अंगावर न फेकता तिच्या चरणांवर अर्पण करावी.
८) मूर्ती दूर असेल, तर ती वस्तू देवतेसमोरील ताटात ठेवावी.
९) 'देवतेच्या चरणी लीन होत आहोत', या भावाने नमस्कार करावा.
१०) दोन्ही हात जोडून भावपूर्ण नामजप करत मध्यम गतीने प्रदक्षिणा घालाव्यात. सर्वसाधारणतः देवांना सम संख्येने आणि देवींना विषम संख्येने प्रदक्षिणा घालाव्यात.
११) देवळात बसून थोडा वेळ नामजप करावा. प्रसाद शक्यतो देवळात बसूनच ग्रहण करावा.



१२) निघण्यापूर्वी देवतेला नमस्कार करून 'तुझी कृपादृष्टी माझ्यावर सदैव असू दे', अशी प्रार्थना करावी.
१३) देवळातून बाहेर पडत असताना देवतेकडे आपली पाठ एकदम होणार नाही, याची काळजी घ्यावी.
१४) देवळातून बाहेर पडल्यावर आवारातून परत एकदा कळसाला नमस्कार करावा आणि मग प्रस्थान करावे.

# महाराष्ट्रातील कुलाचार आणि देवघरातील टाक : एक अमूल्य आध्यात्मिक व ऐतिहासिक ठेवा...

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अनादी काळापासून मानव आपल्या सभोवतालच्या अमर्याद निसर्ग शक्तींना देवतांच्या रूपात पाहत आला आहे. निसर्गाच्या या विराट आणि अनंत शक्तींचे पूजन करताना त्याने चराचरात ईश्वराचे अस्तित्व अनुभवले. याच श्रद्धेतून त्याने निसर्गातील तत्त्वांना मूर्त रूप देऊन मंदिरे उभारली आणि उपासना सुरू केली. अशा अनेक देव-देवतांच्या मांदियाळीत कुलदैवतांचे स्थान सर्वाधिक महत्त्वपूर्ण मानले जाते. कुलदैवताचा आशीर्वाद आपल्या कुळावर सदैव असावा आणि त्यांची सेवा आपल्याला घरामध्ये राहूनच निरंतर करता यावी, या पवित्र संकल्पनेतून कुलदैवतांच्या टाकाची निर्मिती झाली. दैवी वरदहस्त नेहमी आपल्यावर असावा, हा त्यामागचा मुख्य संकेत असून, म्हणूनच महाराष्ट्रातील घराघरांत कुलदैवताचे टाक कुलाचाराने पूजले जातात.

### मूर्ती आणि टाक : शास्त्रशुद्ध फरक आणि महत्त्व

अनेकांना प्रश्न पडतो की मूर्ती असताना टाक कशासाठी? मूर्ती ही पाषाणाची किंवा धातूची पूर्ण आकृती असते, तर टाक हा धातूच्या पत्र्यावर उठावदारपणे कोरलेली प्रतिमा असते. शास्त्रानुसार टाक हे कुलदैवताचे चल (पोर्टेबल) रूप मानले जाते. जेव्हा कुलधर्म-कुलाचारासाठी किंवा प्रवासासाठी बाहेर पडावे लागते तेव्हा कुलदैवताचे सान्निध्य सोबत राखण्यासाठी टाकाची निर्मिती केली गेली. हा टाक शास्त्रशुद्ध कसा असावा, याचेही काही संकेत आहेत. तो पूर्णपणे जोडविरहित असावा. निसर्गाच्या मूळ तत्त्वातच दैवी अंश मानलेला असल्यामुळे टाकांची निर्मिती ही याच संकेताच्या आधारे केली जाते. जीवन हे पृथ्वी, आप, तेज, वायू आणि आकाश या पंचतत्त्वांपासून निर्माण होते आणि त्यातच विलीन होते. याच पंचतत्त्वांचे प्रतीक म्हणून टाक हा नेहमी पंचकोनी असतो.

### धातूंचे विज्ञान आणि आध्यात्मिक संकेत...

कुलदैवतांचे टाक धातूपासून बनलेले असतात. प्रामुख्याने चांदीच्या पत्र्यावर कुलदैवताची प्रतिमा उठावाने तयार केलेली असते. या टाकांच्या मागील बाजूस राळ किंवा लाख लावून तांब्याची पाठ बसवलेली असते. पांढरा रंग हा निर्मलता आणि प्रकाशाचे प्रतीक असून या प्रकाशातूनच जीवन फुलते, म्हणून चांदी या शुभ्र धातूचा उपयोग प्रतिमेसाठी केला जातो. त्याचप्रमाणे तांबडा रंग हा तेजाचे प्रतीक म्हणून शीतलता देणाऱ्या तांबे धातूचा उपयोग टाकाच्या पृष्ठभागासाठी (मागील बाजू) केला जातो. मुखभाग व पृष्ठभाग यामध्ये निसर्गात मिळणाऱ्या ज्वलनशील राळ किंवा लाख या पदार्थाचा उपयोग केला जातो.

### ऐतिहासिक आणि प्रादेशिक परंपरा

**संरक्षक कवच :** विदर्भ आणि मराठवाड्यासारख्या क्षेत्रांमध्ये या टाकांशी संबंधित अत्यंत अनोख्या प्रथा आढळतात. पूर्वी दळणवळणाची साधने नसताना, प्रवासात अनेक संकटे असायची. त्यामुळे लग्नकार्यासाठी किंवा शुभ कार्यासाठी घराबाहेर पडताना, कुलदैवतांचे टाक एका पवित्र कापडात बांधून



नवरदेवाच्या गळ्यात घालण्याची पद्धत होती. हे केवळ धार्मिक कर्मकांड नसून, कुलदैवत नवरदेवाच्या पाठीशी ढाल बनून उभे आहे, असा विश्वास त्यामागे असे. तसेच, ऐतिहासिक काळात युद्धावर जातानाही योद्धे हे टाक आपल्या सोबत ठेवत असत. हा टाक म्हणजे त्यांच्यासाठी एक प्रकारचे संरक्षक कवच (डिव्हाईन शिल्ड) असायचे, जे संकटाच्या वेळी त्यांचे रक्षण करत असे.

### देवघरातील टाकांची संख्या आणि रचना

देवघरातील टाकांची संख्या काही ठिकाणी ५, ७, ९, ११ अशा विषम संख्येत आढळते. ती त्या कुलाची कुलदैवते असतात. कुटुंबाचे मूळ ठिकाण, जात, कूळ इत्यादी घटकांचा देवघराच्या रचनेवर मोठा परिणाम होतो. खंडोबा हा कुलस्वामी जवळजवळ सर्वच घरांमध्ये दिसतो, तर भवानी, महालक्ष्मी, रेणुका इत्यादी कुलस्वामिनी वेगवेगळ्या रूपात दिसतात. मरीआई, लक्ष्मीआई, काळकाई, जानाई, यमाई, बोलाई, जरीमरी, सातीआसरा अशा विविध देवता विविध कुळांमध्ये आढळतात. जोतिबा, रवळनाथ, वीर, बापदेव अशी पुरुष दैवतेही असतात. काही ठिकाणी पूर्वज (पितर), चेडा, वेताळ, मुंज्या यांचीही स्थापना टाकरूपाने दिसते. आपल्या देवघरातील टाक परिपूर्ण असावे, तसेच एकाच देवतेच्या अनेक प्रतिमा नसाव्यात असा संकेत आहे. खंडित किंवा भग्न टाक पूजनासाठी निषिद्ध मानले जातात.

### टाकांवरील चिन्हांवरून देवतांची नेमकी ओळख

**जानाई (योगेश्वरी अथवा जोगेश्वरी) :** जानाई आणि भैरवनाथ हे ग्रामदैवत आहेत. जानाई ही स्त्री दैवत असल्याने अधिक कनवाळू मानली जाते. टाकाचे निरीक्षण केल्यास एका बाजूला बाजरीचे कणीस आणि हातात कापलेले पीक दिसते (मुबलक अन्नधान्याचे प्रतीक). दुसऱ्या बाजूला लहान मूल (पुत्रपौत्र लाभ), सूर्य-चंद्र (अहोरात्र रक्षण) आणि पशुधन (दूधदुभते उत्तम राहण्यासाठी) दर्शविलेले असते. घराची भांडीकुंडी सुरक्षित राहो, ही मनोकामनाही यात असते.

**लक्ष्मीदेवी :** हिला पलंगावरची देवी असेही म्हणतात. लक्ष्मी स्थिर असावी म्हणून ती बसलेल्या मुद्रेत असते. हातात शस्त्रे असल्याने ती धनसंपत्तीचे रक्षण करते. हिलाच मरीआई, महामारी किंवा कडकलक्ष्मी असेही संबोधले जाते. आषाढ महिन्यात आजार पसरू नयेत आणि पीक उत्तम यावे म्हणून हिची मनोकामना केली जाते.

**म्हसोबा :** हा शिवाचाच ग्राम्य अवतार आहे. टाकातील रेडा म्हणजेच महिष (महेश). देवीने महिषासूर मर्दन केले तेव्हा त्याच्या शरीरातून शिव प्रकट झाले, हा संदेश यातून मिळतो. शेती आणि पशूंचे रक्षण करणारा हा देव अत्यंत जागृत मानला जातो.

**खंडोबा :** महाराष्ट्राचे हे कुलदैवत पशुपालन संस्कृतीशी जोडलेले आहे. टाकात खंडोबा नेहमी सपत्नीक आणि घोड्यावर स्वार दिसतो. टाकातील कुत्रा हा विश्वासाचा प्रतीक असून पती-पत्नीमधील विश्वासाचा संदेश देतो. चंपाषष्ठी, सोमवती अमावास्या आणि रविवारी याचे कुलाचार केले जातात. भांडार आणि खोबरे याला पूजेत महत्त्वाचे स्थान आहे.

**महिषासुरमर्दिनी :** हा टाक स्त्रीशक्तीच्या विजयाचे प्रतीक आहे. देवीने एका हाताने रेड्याची जीभ पकडली आहे, याचा अर्थ माणसाने शब्द जपून वापरावेत. ही देवी अहोरात्र संसाराचे रक्षण करते. महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठांपैकी एक कुलदेवता म्हणून पुजली जाते.

**देवांचा रक्षक (वीर) :** हा घराचा द्वारपाल किंवा वॉचमन आहे. हातात तलवार-ढाल किंवा धनुष्यबाण धारण केलेला वीर, घरातील भांडीकुंडी आणि देवांचे रक्षण करतो. टाकातील चार फुल्या आणि गोल हे देवांचे प्रतीक मानले जातात.

**इतर प्रमुख टाक :**
१) बनेश्वरी-वनशंकरी (सिंहावर आरूढ) २) काळूबाई (मुखवटा व गजरा) ३) अन्नपूर्णा (हातात पळी) ४) रेणुका (मुखवटा व दोन अर्धचंद्रांचा मुकुट), ५) एकविरा (एक बाण व डोंगराचे गोटे) ६) अंबेजोगाई (मुखवटा, हनुवटी वर गेलेली) ७) यल्लम्मा (दहा हात व डोक्यामागे चक्र) ८) साती आसरा (सात देवी व मगर), ९) चंद्रसेन उर्फ चांदोबा (घोड्यावर तलवारधारी, सोबत जानाई-जोगेश्वरी).

### देवघरातील टाकांची देखभाल

- रोज पाण्याने धुतल्यावर स्वच्छ सुती कापडाने टाक कोरडे करावेत.
- गंध-अक्षता वाहताना कोरड्या स्वरूपात वाहाव्यात, ओला गंध टाळावा.
- स्निग्ध पदार्थांनी पूजा केली असल्यास तेलकटपणा पूर्ण जाईल असे स्वच्छ धुवावे.
- रासायनिक पावडरऐवजी चिंच, लिंबू किंवा टूथपेस्टचा वापर करावा.
- दिव्याचा तेलकटपणा टाकांवर चढणार नाही याची दक्षता घ्यावी.
- टाक खाली पडणार नाही याची काळजी घ्यावी, अन्यथा कोपऱ्यांची पकड सैल होते.

आपल्या कुलाचाराची ही परंपरा जपणे आणि देवघर परिपूर्ण ठेवणे हे प्रत्येक परिवाराचे कर्तव्य आहे.

(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)